| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०६ वा | मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# अतिवृष्टी आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर सामुदायिक विवाह सोहळे

## आठही तालुक्यात आयोजन : आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा पुढाकार

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- पिकाचे पैसे हातात आल्यावर आपल्याकडे लग्नकार्य थाटात साजरे केले जाते. मात्र यंदा अतिवृष्टी आणि महापुरामुळे पिकांचा चिखल झाला आहे. दुर्दैवाने खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे ज्या आपत्तीग्रस्त कुटुंबात लग्न कार्य ठरलेले आहे ते कुटुंब मोठ्या विवंचनेत सापडले आहेत. लग्नकार्य पुढे ढकलण्याचा अनेकजण विचार करीत आहेत तर काहीजण खाजगी सावकारावर विसंबून आहेत. अशा संकटाच्या काळात बाधित शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा यासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यात सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. त्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत तहसीलदार यांच्याकडे नावनोंदणी करण्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

धाराशिव शहरातील प्रतिष्ठान भवन येथे सोमवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील बोलत होते. फेब्रुवारी महिन्यात ६ आणि ७ तारीख विवाह सोहळ्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. आपल्या बहुतांश सहकाऱ्यांसह आपण स्वतः व्यक्तिगत पातळीवर या महत्वाच्या प्रक्रियेत तन-मन - धनाने सहभागी होणार आहेतच. त्याव्यतिरिक्त तेरणा ट्रस्ट, तुळजाभवानी मंदिर संस्थान आणि राज्यातील इतर सामाजिक संस्थांचाही सहभाग असणार आहे. जिल्हा प्रशासनही यात उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहे. पुढील काळात राज्यातील ज्या जिल्ह्यांत अतिवृष्टीचा अधिक फटका बसला आहे त्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी अशा पद्धतीने पुढाकार घेत सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करावेत असे आपले प्रयत्न असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी नमूद केले.

अतिवृष्टी आणि महापुरामुळे ओढवलेल्या पार्श्वभूमीवर खूप समस्या उद्भवल्या आहेत. अनेकांनी आपल्याकडे गांभीर्याने लग्न कार्याच्या अनुषंगाने निर्माण झालेले पेच मांडले आहेत. त्यामुळे ही आपल्या सर्वांची सामाजिक जबाबदारी म्हणून आपण सर्वांनी यात पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी गरजूंनी त्यांच्या तालुक्यातील तहसीलदारांकडे ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करून घ्यावी. तसेच इतरांनी जमेल त्या प्रकारे या सामाजिक कामासाठी उत्स्फूर्तपणे योगदान द्यावे असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. यावेळी

**वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा**

दोन दिवसांनी ३० ऑक्टोबर रोजी येणाऱ्या वाढदिवसाच्या दिवशी आपण मुंबईत आदरणीय डॉ. पद्मसिंह पाटील साहेबांसोबत असणार आहोत. त्यामुळे प्रेमाच्या भावनेतून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपण धाराशिव येथे नसल्याची नोंद घ्यावी. आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केल्यास आपल्याला त्याचा सर्वाधिक आनंद होईल. अतिवृष्टी आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना, बाधित आणि अडचणीत सापडलेल्या माता भगिनींना दिलासा देऊन समाजोपयोगी कार्यक्रमांच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्यात यावा असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दत्ता रा.गौर ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२५.१०.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ६ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर रामेश्वर रा.पानगाव ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२५.१०.२०२५ रोजी आपल्या पानगावबस समोरील पानटपरीचे समोर अंदाजे ३,२०० किंमतीची ३२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर अक्काबाई रा.लक्ष्मी पार्वतीर नगर येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२५.१०.२०२५ रोजी आपल्या घरा समोर अंदाजे २२,१०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु व २०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत रुक्मीणीबाई रा.पागुर ता.लोहारा जि. धाराशिव हे दि.२५.१०.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,५३० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### गळ्यातील सोन्याचे दागिने घेऊन झाले पसार

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विकास प्रकाश चौथवे, वय ३८ वर्षे, रा. पन्हाळवाडी ता. भुम जि. धाराशिव हे त्यांची पत्नी दोघे दि.२४.१०.२०२५ रोजी मोटरसायकलवरुन हाडोंग्री व हिवरा मध्ये बाळुसाहेब पाटील यांचे ध्यान केंद्राचे चढाजवळ पार्डी रोड भुम येथुन जात असताना अनोळखी तीन इसमांनी फिर्यादीचे मोटरसायकला कट मारल्याने मोटरसायकल रोडलगत उभी केली असता नमुद इसमांनी मोटरसायकलवर येवून लोखंडी विळ्याचा धाक दाखवून फिर्यादीचे पत्नीचे गळ्यातील सोन्याचे दागिने २० ग्रॅम वजनाचे व रोख रक्कम ६,००० असा एकुण ६६,००० किंमतीचा माल अंधाराचा फायदा घेवून जबरीने लुटून पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विकास चोथवे यांनी दि.२५.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## अभ्यासक्रम बहुजन सन्मुख करण्यात शेळकेंचेही योगदान

## आत्मकथन प्रकाशन सोहळ्यात इंद्रजित भालेराव यांचे गौरवोद्गार



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- एका टप्प्यावर शालेय अभ्यासक्रमात बहिणाबाई चौधरी, विठ्ठल वाघ, भास्कर चंदनशिव आणि आपल्यासारख्या साहित्यीकांना अभ्यास मंडळाने सन्मानपूर्वक स्थान दिले. अभिजन सन्मुख असलेला अभ्यासक्रम या अभ्यास मंडळामुळे बहुजन सन्मुख झाला. त्यात भास्कर शेळके यांचेही योगदान महत्वपूर्ण आहे, अशा शब्दांत प्रख्यात साहित्यीक इंद्रजित भालेराव यांनी शेळके लिखित अजुनि चालतोची वाट या आत्मकथन प्रकाशन सोहळ्यात गौरवोद्गार काढले.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या सभागृहात मराठवाडा साहित्य परिषदेच्या धाराशिव शाखेच्या वतीने ज्येष्ठ लेखक तथा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त भास्कर शेळके यांच्या आत्मकथनाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ एम. डी. देशमुख उपस्थित होते. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, प्रभारी प्राचार्य डॉ. संदिप देशमुख, मसाप शाखा अध्यक्ष नितीन तावडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भालेराव यांनी आत्मचरित्र हा लोकशाहीवादी वाडमय प्रकार आहे. आत्मचरित्र लिहिणे हे जेवढे सोपे आहे, तेवढेच अवघडही आहे. या आत्मकथनात भास्कर शेळके यांनी शेती आणि शेतकर्यांचे भावविश्व उलगडून दाखवले आहे. यात संपूर्ण गावगाडा आहे. हजारो वर्षांची भाषा आणि हजारो वर्षांचे अनुभवातून आलेले ज्ञान यात पानोपानी पहायला मिळते. भाषा वापरण्याची लकब गावगाड्यातून पुढे आली. तीच लकब शेळके यांनी चकखलपणे शेळके यांनी टिपली आहे. एक आदर्श अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कसे असते, हे धाराशिवच्या मसाप शाखेने सिध्द करून दाखवले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील ही महत्वाची शाखा असल्याचेही भालेराव यांनी शेवटी नमुद केले. यावेळी लेखक भा. न. शेळके यांनी त्यांच्या भावना व्यक्त करीत असताना लेखनामागील प्रेरणा आणि प्रवास उपस्थितांसमोर मांडला. एम. डी. देशमुख, आमदार विक्रम काळे, प्राचार्य देशमुख यांनीही यावेळी मनोगतपर शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रास्ताविक प्रा. अरविंद हंगरगेकर यांनी तर आभार बालाजी तांबे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी रवींद्र केसकर यांनी केले. यावेळी शहर आणि परिसरातील साहित्यप्रेमी, रसिक बहुसंख्येने उपस्थित होते

## धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीची भाजपची तयारी पूर्ण- दत्ताभाऊ कुलकर्णी



धाराशिव- जिल्ह्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था भाजपच्या ताब्यात आणण्याची आमची तयारी पूर्ण झाली असल्याचा दृढ विश्वास भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. जिल्ह्यातील आठ नगरपालिका, आठ पंचायत समित्या तसेच जिल्हा परिषद ताब्यात घेण्यासाठी पक्षाकडून संघटित व शिस्तबद्ध मोहीम सुरू असून, आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही रणनीती आखण्यात येत आहे. पक्ष संघटनेत उत्साहाचे वातावरण असून, प्रत्येक प्रभाग व बूथनिहाय कार्यकर्त्यांची बांधणी सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आढावा बैठका घेऊन स्थानिक मुद्द्यांचा अभ्यास करण्यात येत आहे. विरोधकांच्या ताब्यात असलेल्या पालिकेत त्यांनी केलेल्या कारभाराच्या त्रुटींचा व लोकांना येणाऱ्या स्थानिक अडचणींचा बारकाईने अभ्यास करून, विकासाच्या योजना प्रभावीपणे राबवण्याची आखणी केली जात आहे. धाराशिव जिल्हा परिषदेत ५५ जागा, आठ पंचायत समित्यांमध्ये ११० सदस्य आणि आठ नगरपालिकांमध्ये सुमारे १७५ जागा असून, या सर्व ठिकाणी भाजपने स्वबळावर विजय मिळवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी मित्रपक्षांसोबत युतीबाबत चर्चाही सुरू असल्याचेच सांगितले. तसेच केंद्र आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याचा लाभ घेत जिल्ह्याच्या विकासाचा नवा आराखडा राबवण्याची तयारी पक्षाने पूर्ण केली आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात भाजपची पकड दिवसेंदिवस मजबूत होत असून, कार्यकर्त्यांमधील उत्साह आणि जनतेचा वाढता विश्वास पाहता जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था भाजपच्या ताब्यात येतील, असा आत्मविश्वास जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

## बुध्दविहारे ही समाजातील संस्कार केंद्रे आहेत - विजय गायकवाड



धाराशिव (प्रतिनिधी)- बुध्द काळापासून भारतातील बुध्दविहार हे मानवावरती संस्कार करणारे संस्कार केंद्र आहे. प्रबोधनाचे कार्य करणारे प्रबोधन केंद्रे आहेत. ढोकी येथील साखर कारखाना परिसरात श्रावस्ती बुध्दविहार हे बुध्दांच्या शिकवणुकीचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य करत आहे. तेर-ढोकी व आसपासच्या परिसरात मौर्य काळापासून बुध्द संस्कृती बहरली होती. याची साक्ष देत अनेक सांस्कृतिक पाऊलखुणा बुध्दसंस्कृतीची साक्ष देत उभ्या आहेत. बुध्दाच्या शिकवणूकीत त्रिशरण, पंचशील, आष्टांगीक मार्ग, दहा पारमिता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या २२ प्रतिज्ञा यामुळे संस्कारशिल समाज निर्माण होतो. असा संस्कारशिल समाज निर्माण करण्याचे कार्य ढोकी कारखाना परिसरातील श्रावस्ती बुध्दविहार करत आहे असे विचार बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याचे अभ्यासक, इतिहास संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त विजय गायकवाड यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी उपासक अशोक बनसोडे, बाळासाहेब माने, प्रभाकर बनसोडे, बलभीम कांबळे यांनी बुध्द विहारात भगवानबुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले. उपासक आप्पा कांबळे यांनी सर्वांचे स्वागत केले. श्रावस्ती बुध्दविहार हे या परिसरातील जिल्हयातील प्रत्येक गावातील समाज बांधवांनी पाहून लहानशा जागेत सुध्दा सुंदर बुध्दविहार निर्माण करता येते याचे उदाहरण आप्पा कांबळे व त्यांच्या सहकार्यांनी दाखवून दिले आहे. बुध्दविहारास अनेक दानशूरांनी वेळोवेळी मदत केली आहे असे आप्पा कांबळे यांनी सांगितले. पुढील काळात सुध्दा विहाराच्या वाढीसाठी मदतीचे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी संविधान अभ्यासक बलभीम कांबळे यांनी संविधान प्रास्ताविकेची प्रत आप्पा कांबळे यांना दिली. वैभव कांबळे यांनी सर्वांचे आभार मांडले.

## भव्य लाठी-काठी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन शस्त्रपूजेने संपन्न



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- पी.एम.श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, केसरजवळगा आणि लाठी असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य लाठी-काठी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आज शस्त्रपूजा करून मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून राज्यस्तरीय हॉलीबॉलपटू मुनीर शेख सर उपस्थित होते. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजिज शेख, माजी सरपंच अमोल पटवारी, उपसरपंच जयपालसिंग राजपूत, सहशिक्षक सुनिल राठोड, बोडरे सहदेव, युसूफ गवंडी , श्रीशैल भुरे, कणमुसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शस्त्रांची व साहित्याची पूजा करून पारंपरिक पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यानंतर मुनीर शेख सर यांनी विद्यार्थ्यांना व्यायामाचे व आत्मसंरक्षणाचे महत्त्व पटवून देत पारंपरिक भारतीय कलेचा गौरव सांगितला.दरम्यान उपसरपंच जयंपालसिंग राजपूत यांनी शाळेतील हुशार, गरजवंत वहोतकरू असलेल्या आशा १० विद्यार्थ्यांची फिस देऊन सहकार्य केल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे आभार व कौतुक होत आहे.

या शिबिरात लाठी-काठी, भाला, दांडपट्टा, कराटे, सेल्फ डिफेन्स, लाल तलवार यांचे प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षक मोहमद रफी शेख सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिले जाणार आहे. शिबिराचा कालावधी २६ ते ३१ ऑक्टोबर २०२५ असा असून दररोज सकाळी ८.०० ते ११.३० या वेळेत प्रशिक्षण होणार आहे.

या उपक्रमासाठी प्र मु अ बालाजी भोसले, सहशिक्षक सुनिल राठोड,संजीव भोसले, यु का प्र वैभव पाटील व सर्व शिक्षकवर्ग यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाला पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## राज्यातील अशा घटनेकडे दुर्लक्ष नको..

राज्यात काही अप्रिय घटना घडत आहेत. त्यात फलटनची घटना भयाण आहे. डॉक्टर महिला यांचा खुन का आत्महत्या या बाबत अजून उलगडा झाला नाही. संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अशा घटनेवरून मुळात राज्यात भीती राहीली नाही असेच दिसून येते. गुन्हेगार कोणीही असो त्याला जर भीती नसेल तर असेच प्रकार घडणार आहेत. फलटण प्रकरणी अनेक बाबी समोर येत आहेत. विविध बाबी बाहेर येत आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले आहे त्यामुळे सत्य काय आहे ते बाहेर आल्याशिवाय राहाणार नाही. सत्य आले पाहिजे. जो कोणी आरोपी आहे त्याचा शोध घेऊन जनतेसमोर आणले पाहिजे. डॉक्टर मुलीच्या वडीलांनी जे आरोप केले आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यात सत्य काही प्रमाणात दडले असू शकते. काही कारणाने तपास लांबत गेल्याने राज्यातील जनतेची नारजकी वाढते. त्यामुळे तातडीने शोध घेणे अपेक्षित आहे. राज्यात अशा अप्रिय घटना का घडत आहेत या बाबत विचार केला पाहिजे. त्या घडू नयेत याकडे लक्ष दिले पाहिजे. घटना अशी की, फलटणच्या जिल्हा उपरुग्णालयात काम करणाऱ्या एका डॉक्टर तरुणीने तीन दिवसांपूर्वी आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी या डॉक्टर तरुणीने एक चिठ्ठी आणि तळहातावर लिहिलेल्या मजकूरात फलटणमधील पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि आणखी एका व्यक्तीवर बलात्कार व छळ केल्याचे, तसेच आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचे आरोप होत आहे. यात किती सत्यता आहे याची पडताळणी होणे अपेक्षित आहे. पोलिसांनी गोपाळ बदनेला न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्याला ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या आत्महत्या प्रकरणावरून विरोधी पक्ष सरकारवर, गृहमंत्रालयावर टीका होत आहे, तसेच वेगवेगळे आरोप केले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आरोप केला आहे की ही आत्महत्या नसून ही संस्थात्मक हत्या आहे. डॉक्टर तरुणीवर चुकीचे व नियमबाह्य अहवाल देण्यासाठी, तसेच काही पोस्टमार्टेम रिपोर्ट (शवविच्छेदन अहवाल) बदलण्यासाठी दबाव टाकला जात होता. ती या सगळ्यांशी एकटी लढत होती. मात्र, सगळ्या त्रासाला कंटाळून तिने जीवन संपवले अशी चर्चा चालू आहे. वरचेवर विविध मत व्यक्त केले जात जितेंद्र आव्हाड यांनी यासंदर्भात एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की फलटणमधील डॉक्टर तरुणीची आत्महत्या नसून ही संस्थात्मक हत्या आहे. एका शेतकरी आई-बापाने मोल मजुरी करून, ऊसतोडणी करून आपल्या लेकीला जिद्दीने घडवले, ती कर्तबगार लेक म्हणजे ही डॉक्टर तरुणी! चुकीचे नियमबाह्य अहवाल देण्यासाठी तसेच काही पी. एम. रिपोर्ट बदलण्यासाठी तिच्यावर स्थानिक पोलीस प्रशासन व लोकप्रतिनिधी गेल्या वर्षभरापासून प्रचंड दबाव टाकत होते. पण, डॉक्टर तरुणी कोणत्याही दबावाला न घाबरता आपली आरोग्यसेवा प्रामाणिकपणे करत होती. ती अनेक महिन्यांपासून या प्रशासनातल्या असूरी शक्तींविरुद्ध नियतीचा लढा एकटी लढत होती. असे समजते. पोलीस व प्रशासन आरोग्य विभागातील वरिष्ठ-कनिष्ठ अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधीच्या आशीर्वादाने एकत्र येऊन केलेली संस्थात्मक हत्या आहे असा आरोप होत आहे. त्याच प्रमाणे याप्रकरणी अधिक लक्ष घातले तर सत्य बाहेर येणार आहे. राज्यात अनेक घटना घडत आहेत. काही दुर्दैवी घटनेमुळे सरकारवर नारजकी निर्माण होते. चांगले काम करणारे सरकार असले तरी अशा अप्रिय घटनेमुळे बदनाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एक प्रकारे सरकारचा वचक असणे आवश्यक आहे. त्यासाठी लवकर तपास यंत्रणा सक्रिय होऊन गुन्हाचा उलगडा होणे अपेक्षित आहे. तपास चालू आहे असे म्हणत राहीले तर जनतेत वेगळाच संदेश जाण्याची शक्यता निर्माण होते. मुळात सर्व बाबी सरकारी यंत्रणेचा असतात असे नाही तर काही खाजगी बाबीत चुका होतात. त्याचे खापर सरकारी यंत्रणेवर फोडले जाते. बऱ्याच वेळा मोठ्यांचा हस्तक्षेत असल्यांचा संशय व्यक्त कला जातो. त्यामुळे बननामी सरकारची होती. सरकारने निपक्षपाती चौकशी करणे अपेक्षित आहे. काही झाले तरी दोषी व्यक्तीं हा जनतेसमोर आला पाहिजे. बऱ्याच वेळा खाजगी व्यक्ती, जनतेला खरा दोषी कोण समजलेला असतो तरी जनता गप्प असते ही एक वस्तूस्थिती आहे. त्यामुळे सरकार पक्षाने जनतेची ओरड होण्यापुर्वी चौकशी होणे अपेक्षित आहे. काही झाले तरी तातडीने काही बाबतीत पावले उचलली पाहिजेत. विरोधकांनी ओरड केल्यावर हालचाली होत असतील तर ते योग्य नाही. मुळात फलटण प्रकरणी लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी लक्ष घालून मत व्यक्त केले आहे. त्यामुळे फलटण प्रकरणी मोठी बाब घडली असेल. महिला डॉक्टरच्या विरोधात सर्वजन असतील. ती महिला सत्याच्या बाजूने लढणारी असेल असा अंदाज असू शकतो. त्याच प्रमाणे सदरील महिला चुकीच्या बाबीची बळी ठरले असेल. त्यामुळे अनेक बाबीचा विचार करून सत्य तातडीने बाहेर आले पाहिजे. वरचेवर राज्याच्या गृहविभागावर टिका होत आहे हे योग्य नाही. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळणे आवघड आहे. अशा स्थितीत फलटण प्रकरण अधिक चिघळू न देता तपासास गती देणे अपेक्षित आहे. राज्यात काही अप्रिय घटनेत वाढ होत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कायदा व सुव्यवस्था कडक करावी लागणार आहे. काहींचा इंटरफेअर होत असेल तर त्याही रोखल्या पाहिजेत. गुन्हा लहान असो किंवा मोठा यात न जाता गुन्हा करणाऱ्या शोध घेणे आवश्यक आहे. गुन्हा वारंवार घडत असतील तर ती राज्याची बदनामी होते. बऱ्याच वेळा इतर राज्याबरोबर तुलना होते. ते जर रोखायाचे झाले तर मुख्यमंत्र्यांनी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. तसे पाहिले तर फलटण प्रकरण लवकर शांत होईल असे वाटत नाही. याकडे सर्वांचे लक्ष आहे. विरोधीपक्षाने तर विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे सरकारने सखोल चौकशी करून सत्या काय ते बाहेर आणणे तेही तातडीने आवश्यक आहे.

# सोनार संस्थेला समाज सेवे करिता राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर













सोलापूर - शिक्षण, सहकार, प्रगती हे बोध वाक्य आणि संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे बोध चिन्ह धारण करून सोनार समाज संस्था, सोलापूर, सामाजिक कार्य करीत आहे. शिक्षण, सहकार, प्रगती हे एकात्मतेचे सामर्थ्य आहे हे यातून स्पष्ट होते. वरील ब्रीद वाक्य हे शिक्षण, सहकार, प्रगती या तीनही संकल्पनान्चा मेळ साधून आणि एकत्र काम करून यश मिळविण्याचा संदेश देतात. शिक्षण, सहकार आणि प्रगती यांचा संबंध खूप महत्वाचा आहे. शिक्षण हे सहकाराच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीसाठी एक अत्यंत महत्वाचे शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण हे समाजाच्या प्रगतीसाठी मूलभूत आहे. शिक्षणामुळे लोकांचे जीवनमान उंचावते ते लोकांना ज्ञान आणि कौशल्ये देते जे त्यांना चांगले जीवन जगण्यास आणि समाजात योगदान देण्यास मदत करते. सहकारांमुळे व्यक्ती स्वतःच्या प्रगती बरोबर समाजाच्या आर्थिक प्रगतीत योगदान देतात.समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे एक अत्यंत महत्वाचे माध्यम आहे.शिक्षण आणि सहकार या दोन्ही गोष्टी मिळून सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी मदत करतात. सामाजिक संस्थामुळे समाज संघटीत आणि कार्यरत राहतो. कठीण कार्य सहज हाताळण्याची क्षमता आणि कौशल्य असलेल्या सोलापूरातील सोनार समाजाचे मुख्य प्रतोद सर्वश्री मोहनराव मंद्रूपकर , संजयजी मैदर्गीकर, संतोषशेठ कळमणकर हे या संस्थेचे अग्रणी प्रवर्तक असून त्यांच्या कुशल मार्गदर्शना खाली सोनार संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार, सचिव दत्तगुरु वेदपाठक, सह सचिव गिरीश जमखंडीकर, खजिनदार गजानन सोनार, संचालक इंजि. विजयकुमार पोतदार, इंजि. रुद्रप्पा दोडमनी , प्रा. डॉ. अमर दीक्षित, सौं. चित्रा पोतदार हे सर्वजण निष्ठेने काम करीत आहेत. या संस्थेच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया ने संस्थेस राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर केला आहे. त्यामुळे सर्व अग्रणी प्रवर्तक, पदाधिकारी व संचालक यांना काम करण्यासाठी हुरूप आलेला आहे पर्यायाने संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होण्यास, आणि एक आत्मविश्वास सर्वांच्या मनात फुलत जाऊन आपण नवे इतरांपेक्षा वेगळे कांहीतरी करून दाखवू शकतो ही भावना वाढीस लागली आहे. सोनार समाज संस्था सोलापूर ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. संस्था लोक सहभागातून आणि समाजातील सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या दानशूर व्यक्तींच्या योगदानातून उल्लेखनीय आणि कौतुकास्पद कार्य करीत आहे.

संस्था प्रती वर्षी समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या राज्य भरातील व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचा समाज भूषण, समाज रत्न, समाज गौरव, साहित्य भूषण, सुवर्ण उद्योग रत्न, सुवर्ण युवा उद्योग रत्न, युवा उद्योजक, आदी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून त्यांना सन्मानीत केले जाते. याशिवाय मुलं मुली वयात आले आणि आपल्या उद्योग व्यवसायात रमली की पालकांचा शोध त्यांना जोडीदार शोधण्यासाठी सुरु होतो. पण सध्या नोकरी, उद्योग, व्यवसाय, धकाधकी व धावपळीच्या जीवनामुळे माणसाला वेळ ही अमूल्य झाली आहे. या अडचणी दूर करून समाज बांधवाना एका व्यासपीठावर आणून त्यांचा जोडीदार शोधण्याचा मार्ग सोईस्कर करण्याच्या उदात्त हेतूने सोलापूर येथे मागील पाच सहा वर्षा पासून राज्यस्तरीय मोफत वधू वर मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. तसेच उच्य शिक्षित ज्या मुली आपला जोडीदार उच्य शिक्षित व्यावसायिक मुलाची निवड करतात अशा मुलींचा हिरकणी पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. उच्य शिक्षित मुले नोकरीं न करता आपला पारंपारिक व्यवसाय करत दुसऱ्यांना रोजगार देतात अशा मुलांचा युवा सुवर्ण रत्न उद्योजक पुरस्काराने गौरव करण्यात येतो. सोनार समाज सुशिक्षित, सुसंस्कृत आणि पुढारलेला म्हणून ओळखला जातो पण समाजातील घटस्फोटाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ही समश्या कमी करण्यासाठी समाजातील जेष्ठ आणि अनुभवी बांधवाकडून लग्ना आधी व नंतर ही सुखी आणि समाधानी जीवन जगण्यासाठी समुपदेशन करण्यात येते.तसेच या संस्थेचे महिलाकरिता सहयोगी वसुंधरा महिला मंडळ असून या मार्फत महिला दिन, महिलासाठी आरोग्य शिबीर, तज्ञ् महिला डॉक्टरांचे मार्गदर्शन, आरोग्य विषयक माहिती, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा विविध पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला जातो. तसेच धार्मिक कार्यक्रम जसे नवरात्र उत्सव,, चैत्रा गौरी, मकर संक्रन्ती, अधिक महिना, गोकुळाष्टमी आदी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या सहयोगी संस्थेचे अध्यक्ष सौं.. मृणालिनी मैंदर्गीकर, उपाध्यक्ष सौं. संध्या कळमणकर, सचिव सौं. पल्लवी महामुनी, संचालक सौं. मीरा महामुनी, सौं संगीता पोतदार, सौं. अरुणा तपासे, सौं. साधना वेदपाठक, सौं. गौरी उळेकर, सौं. शुभांगी महामुनी, सौं. मेधा मैंदर्गीकर, सौं. अंजली कुरुलकर, श्रीमती स्मिता पोतदार आदी सक्रिय आहेत. सोनार संस्थेचे सर्व अग्रणी प्रवर्तक, सर्व पदाधिकारी आणि सर्व संचालक हे पदवीधर, इंजिनियर, डॉक्टरेट असे उच्य शिक्षित, सुसंस्कृत असून सर्वजण आपल्या कर्तव्याचे पालन, फळाची चिंता न करता आणि परिणामाबद्दल आसक्ती न ठेवता आपले कार्य समर्पित भावनेने करतात. निःस्वार्थ सेवा आणि कर्तव्याला प्राधान्य आणि महत्व देतात. निःस्वार्थ भावनेने आपल्याला समाजासाठी आणखी चांगले काय करता येईल. याचाच विचार संस्था करते. आपण केलेले समाज कार्य हे बोलून नव्हे तर परिणामामधून दिसले पाहिजे या विचाराचा प्रत्येक्ष प्रत्येय संस्थेने निर्माण केलेल्या कार्यातून दिसून येतो. संस्थेचे शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक, आरोग्य विषयक, पर्यावरण, सांस्कृतिक आदी क्षेत्रातील कार्याचे उद्देशे असून सध्या शैक्षणिक क्षेत्रात विध्यार्थ्यांना येणाऱ्या जसे जातींचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र आदी अडचणीचे निराकरण करणे, सामाजिक क्षेत्रात विविध सामाजिक कार्यक्रम उदा. वधू वर मेळावा, विश्वकर्मा कौशल्य विकास योजना, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळा कडील विविध कर्ज योजनांच्या माहितीचे प्रसार आणि प्रचार करणे, प्रधान मंत्री आवास योजनेचे माहिती देऊन त्याचा लाभ घेणेबाबत प्रवृत्त करणे, सोनार समाजातील सोलापूर जिल्ह्यातील थोर संत श्री. नरहरी महाराज पंढरपूर यांचे आई सावित्रीबाई, वडील अच्युतबाबा व मोठे बंधू नारायण स्वामी यांच्या समाधी कोर्टी तालुका पंढरपूर येथे आणि प्रत्येक्ष भगवंत विठ्ठल यांचेशी बोलणारे संत नामदेव महाराज यांचे गुरु व सोनार समाजाचे प्रसिद्ध संत श्री. विसोबा खेचर यांची समाधी बार्शी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या शेजारी आहे. कोर्टी ता. पंढरपूर व बार्शी येथील दोन्ही संतांच्या समाधी स्थळाचे नूतनीकरण जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करून त्यावर छत, समाधी कठ्याभोंवती रेलिंग आदी कामे करून संतांच्या समाधी स्थळाचे पावित्र्य जपण्यासाठी मा. मुख्यमंत्री, मा. पालकमंत्री तसेच पंढरपूर व बार्शी विधानसभा मतदार संघांचे आमदार द्वय यांचेकडे सतत पाठपुरावा संस्था करत आहे. आरोग्य क्षेत्रात आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य, महात्मा फुले जन आरोग्य आदी शासनाच्या विविध आरोग्य विषयक मोफत उपचार योजनेचा लाभ गरजूना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ नुकतेच सोलापूर येथील समाज बांधवास लाभ मिळवून देण्यात आला आहे.संस्थेची क्षमता, कुवत, विचारात घेऊन संस्थेमार्फत सामाजिक कार्ये करण्यात येत आहेत. या कामी सोलापूर चे श्री भारतशेठ कारीकर, सुरेश महामुनी, प्रकाश तपासे,किशोर कुरुलकर, अवधूत महामुनी, उमेश कुरुलकर, कैलास अवसेकर, सूर्यकांत पंडित झरेगावकर, चिदानंद पोतदार गुरुजी, श्रीमती शशिकला वेदपाठक, शिल्पा ओसवाल तहसीलदार मॅडम , अनील टंकसाली, इंजि. जितेंद्र दीक्षित , सिद्धाराम पोतदार ( रियल इस्टेट ) सतीश पोतदार मेडिकल , विवेक वेदपाठक, नाना वेदपाठक, निलेश धाराशिवकर, विजयकुमार भास्करे, से. नि.प्राचार्य राज सोनार जेऊर, अकलकोट, श्रीकांत दीक्षित साहेब, सुभाष वेदपाठक मोडनिंब, प्रमोद भैय्या वेदपाठक माढा, अमोल महामुनी जेऊर, आनंद पालकर कराड, संजय आष्टीकर आष्टी , अजीत पोतदार वशीकर मिरज, शंकरराव पोतदार आरग, डॉ. मदन क्षीरसागर , हेमंतकुमार महामुनी पंढरपूर, सुरेश पंडित कोल्हापूर, डॉ. रोहित दीक्षित सातारा, अविनाश पंडित धाराशिव, देवेंद्र पोतदार जत, संजय बानकर इंदापूर, प्रकाशदादा पोतदार सांगली,पुणे येथील उद्योजक कृष्णकुमार पोतदार, इंजि. सुभाष घोडके, राजाभाऊ मैंदर्गीकर, जगन्नाथ धर्माधिकारी मसूर,बाळकृष्ण पोतदार पनवेल, दैनिक शिवनातीर औरंगाबाद चे संपादक मधुकर महाले, दैनिक संतसूर्य मंगळवेढा चे संपादक विक्रांत पंडित, दैनिक लातूर समाचार चे संपादक विवेकानंद जडे,साप्ताहिक विराट शक्ती कवठे पिरान, चे संपादक विजय पोतदार, मराठी बाणा न्यूज चॅनेल पंढरपूर चे विनोद पोतदार, सोलापूर २४ तास चे संपादक विरभद्र पोतदार दूधनी या सर्वांचे योगदान व अमूल्य सहकार्य लाभत आहे. सध्याचे काळात सामाजिक कार्य करणे अवघड आणि कठीण आहे. त्यामुळं समाजातील दानशूर व्यक्तींनी देणगी म्हणून नव्हे तर समाजासाठी दान म्हणून द्यावे. समाजातील उदार देणगीदाराशिवाय कोणतेही सामाजिक कार्य करणे शक्य होणार नाही .तरी समाजातील दानशूर बांधवानी सामाजिक बांधिलकी जपत संस्थेला आर्थिक मदत करावी असे आवाहन सोनार समाज संस्थेने केले आहे.

**वसंत पोतदार अध्यक्ष,**
**सोलापूर**
**मोबाईल ९४२३०६५९१५**

## ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा

२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ ('$mile Reynaud) यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे "Pantomimes Lumineuses' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने (ASIFA) २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे. ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे.

ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे. गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल ३ऊ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने "The Banyan Deer' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू (Pierre Bourdieu) यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्र्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात.

तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे. भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ॲनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न्, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात.

ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी "Culture Industry' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडूटेनमेंट' (Education + Entertainment) या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. 3D, आणि AI यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. YouTube, Netflix, Hotstar, Amazon Prime सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि "Make in India'

>> पान ५

# लिंबू पाणी प्यायल्यामुळे वजन कमी होते का ? वाचा सविस्तर...

बऱ्याच लोकांना आपला दिवस एक ग्लास लिंबू सरबताने सुरू करणे आवडते. लिंबाचे पाणी शरीराला डिटॉक्स करते आणि पचन सुधारते असा विश्वास आहे. पण तज्ज्ञांचे मत आहे की, या दाव्यात तथ्य नाही. गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टच्या मते, लिंबू पाण्याचे योग्य प्रकारे सेवन करणे नक्कीच फायदेशीर ठरू शकते, परंतु त्याचा 'मॅजिक पोशन' म्हणून विचार करणे योग्य नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की लिंबू पाणी शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी आणि पचनास मदत करण्यासाठी उपयुक्त आहे, परंतु ते थेट शरीरातून विष- ारी पदार्थ काढून टाकत नाही किंवा



थेट चरबी कमी करू शकत नाही.

लिंबू पाणी पिण्याचे फायदे :

१. लिंबू पाणी प्यायल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.
२. हायड्रेशन आणि पचनसाठी हे एक चांगले पेय आहे.
३. त्याची आंबट चव ज्यांना साधे पाणी पिणे आवडत नाही त्यांच्यासाठी साध्या पाण्याचा एक चांगला पर्याय बनवते. ४. लिंबाच्या रसा- तील आम्ल पोटाला पाचक एंजाइम तयार करण्यास मदत करू शकते.
५. लाळेच्या उत्पादनास देखील उत्तेजन देते.

**प्रत्येक व्यक्तीमध्ये भिन्न फायदा :** लिंबू सरबताचा फायदा प्रत्येक व्यक्तीमध्ये भिन्न असू शकतो. लिंबू सरबताचे प्रमाण आणि वेळ लक्षात घेणे ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. दिवसा- तून फक्त एकदा किंवा दोनदा लिंबू सरबत

लहानशा गोष्टी, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर

'स्वच्छ मुंबई ,सुंदर मुंबई ' असे फलक मुंबईत ठिकठिकाणी आपण पाहतो. अनेक प्रसार माध्यमे स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकतेने प्रचार करतात. अगदी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रात्रीचीही स्वच्छता मोहीम राबवली. तेव्हा गाडगेबाबांची आठवण झाली.'आधी केले मग सांगितले', याप्रमाणे त्यांनी स्वत: गाव व पाणवठा स्वच्छ ठेवावा यासाठी लोकांबरोबर काम केले. शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे अन्न, कपडे, घर, शरीर, परिसर यांच्या स्वच्छतेबद्दल ज्ञान मिळाले. या स्वच्छतेच्या सवयी प्रत्येक व्यक्तीच्या भिन्न प्रकारच्या असतात.

सध्या दिवाळी सण आपण साजरा करत आहोत. आपल्यापैकी किती जणांच्या लक्षात आले की रस्त्यावर भरपूर फटक्यांच्या कागदाचा ढीग पडलेला दिसतो. साहजिकच प्रदूषण वाढते. शहरात विविध कार्यक्रम होत असतात. तेथे मोर्चे, मेळावे, सभा, संमेलने, शिबिरे. आंदोलने निदर्शने करण्यासाठी लोक एकत्र येतात. त्यावेळेस होणारी परिसराची अस्वच्छता ही दैनंदिन जीवनात बाधा आणणारी गोष्ट असते. अशा वेळी कितीही मनुष्यबळाचा वापर केला तरी तो अपुराच पडतो.आपण एकीकडे गतिमान आयुष्याच्या गोष्टी करतो.पण त्याच वेळेस अगदी आपल्या आजूबाजूच्या परिसरात सहज कचरा करतो. आपण पाहतो की कोणताही छोटा-मोठा कार्यक्रम झाल्यानंतर जेवढा उत्साहाने आपण उपक्रम साजरा करतो, तेवढीच जबाबदारी मात्र स्वच्छतेबाबत घेत नाही. पेपर प्लेट्स, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकचे ग्लास, थर्मो कॉल, चिप्सच्या पिशव्या-हा सगळा कचरा जागोजागी टाकला जातो. आणि मग आपलेच सुंदर शाळा-परिसर, कुरूप आणि अस्वच्छ दिसू लागतो. मैदाने फक्त ठरावीक काळापुरतीच स्वच्छ न राहता बाराही महिने त्याची निगा व स्वच्छता ठेवणे महत्त्वाचे असते. हे चित्र बदलायचे असेल, तर सर्वप्रथम वृत्ती बदलावी लागते.




स्वच्छता ही फक्त एका शिपायाची, शिक्षकाची किंवा संस्थेची जबाबदारी नसून - ती आपल्यापैकी प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कार्यक्रमानंतर फक्त १ मिनिट स्वतः चा कचरा उचलून कचराकुंडीत टाकला, तरी परिसर स्वच्छ राहील.

चला, आपण काही छोटे पण परिणामकारक नियम आजपासून पाळूया- १. कचरा कचराकुंडीतच टाकूया २. एक-व्यक्ती-एक-कचरा नियम पाळूया ३. प्लास्टिकचा वापर कमी करूया ४. कार्यक्रमानंतर 'स्वच्छता पाच मिनिटे' उपक्रम राबवूया आपला परिसर स्वच्छ असेल, तर वातावरण स्वच्छ राहील. वातावरण स्वच्छ राहील, तर विचारही स्वच्छ होतील. आणि विचार स्वच्छ झाले तर वृत्ती बदलून समाज बदलायला वेळ लागणार नाही. म्हणूनच, आज आपण सर्वांनी मनापासून एक संकल्प करूया.

कचरा बाहेर नाही, फक्त कचराकुंडीतच! स्वच्छ शाळा-सुंदर शाळा-आपली अभिमानाची शाळा! हल्ली कोणताही शाळेचा कार्यक्रम, स्नेहसंमेलन, समारंभ किंवा उपक्रम झाल्यानंतर प्लास्टिक, पेपर, थर्मो कॉल, पाण्याच्या बाटल्या यासारखा कचरा जागोजागी टाकला जातो. त्यामुळे शाळेच्या परिसराचे सौंदर्य नष्ट होते, तसेच अस्वच्छता व दुर्गंधी निर्माण होते. यासाठी खालील उपाययोजना कराव्यात- १. कार्यक्रम स्थळी स्वतंत्र कचराकुंड्या ठेवणे -सुक्या व ओल्या कचऱ्यासाठी वेगवेगळे डबे २. पूर्वसूचना देणे-सभेपूर्वी / उद्घाटनावेळी स्वच्छतेबाबत स्पष्ट सूचना ३. स्वच्छता स्वयंसेवक गट तयार करणे- ४. प्लास्टिकचा वापर टाळणे ५. कार्यक्रमानंतर '५ मिनिट स्वच्छता उपक्रम' - प्रत्येक सहभागी व्यक्तीने स्वतःचा कचरा स्वतः जमा करणे ६. घोषणा फलक लावणे -कचरा इथे टाकू नका, णीश ऊींींलळप ७. कचऱ्याची योग्य विल्हेवाट - नगरपालिका / रिसायकलिंग यांना नियमित देणे कार्यक्रमापूर्वी किंवा अधूनमधून घोषणा / सूचना द्याव्यात. कृपया कार्यक्रमानंतरचा सर्व कचरा कचराकुंडीतच टाका. हा आपला परिसर, आपली जबाबदारी. स्वच्छता राखा आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यास सहकार्य करा. किंवा उश्रशरपश्रळपर्शीी ळी शींशीूपश'ी ीशीोर्पीळलळश्र- ळीूं. घळपवश्रू ीश ींहश वींींलळप रपव ज्ञशशर्ी ीी लराीी लश्रशरप. मुंबई बाहेर गेल्यावर इतर काही शहरे, रेल्वे, रस्ते, मंदिरे यांची स्वच्छता डोळ्यांत भरण्यासारखी असते. तेव्हा प्रथम जाणवतात तेथील केलेले कायदे, तेथील नेमलेल्या लोकांचे प्रामाणिकपणाचं काम, तिथली लोकशिस्त. हे सगळं पाहिल्यावर आम्हाला स्वच्छतेचे संस्कार कमी पडत आहेत हे जाणवतं. याचा आम्ही आग्रह, प्रयत्नही करत नाही.

स्वच्छतेसाठी पाठपुरावा करत नाही. शाळेत होणारे संस्कार तिथेच राहतात. परिसरातील स्वच्छता कशी राखावी याची जाणिव मोठ्यांना दिसत नाही. तर पुढच्या मुलांना कोणी सांगणार? त्यामुळं रेल्वेफाटक, रेल्वेचे रस्ते, भाजीबाजार, बसस्थानक, मैदान, समुद्रकिनारे, बागा, आजूबाजूच्या गल्लीबोळातही कचऱ्याचे ढीग दिसतात. रस्ते, भिंती पान थुंकण्यानं रंगल्याच दिसतात. त्याबाबत शासकीय पातळीवरील उपाय हे अपुरे पडतात. येथे मनाची स्वच्छता ज्याला त्याला हवीच. मनाची स्वच्छता असेल तरच परिसराची स्वच्छता शक्य होते, स्वतःपासून बदल सुरू झाला तर समाज आपोआप सुशोभित होतो. मनातील कचरा दूर केला तरच जीवन सुगंधी होते, बदल हृदयात रुजला की समाजही सजायला

# भय संपणार कसे ?



एका महिलेस आत्महत्या करावी लागली याचे कारण पोलिस दलातील निष्क्रियता हे आहे. या खात्यातील लाचखोरीबद्दल अनेक वर्षे बोलले जात आहे. घडत काही नाही आणि गुन्हेगारी फोफावते.

वारंवार झालेला बलात्कार, लैंगिक छळ यामुळे आणखी एका महिलेस जीवन संपवावे लागले आहे. ही महिला उच्च शिक्षित होती आणि तिचा छळ करणारा पोलिस अधिकारी आहे, हे वास्तव समाजास लांच्छन आहे. आत्महत्येची घटना उघडकीस आल्यानंतर दोन्ही आरोपी 'बेपत्ता' होते. त्यापैकी एक सापडला असला तरी पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने अजूनही मोकाट आहे. त्याला पकडण्यासाठी पोलिसांना पथक तयार करावे लागले आहे. ज्याच्या विरुद्ध आधीही तक्रार करण्यात आली होती अशी उपनिरीक्षक पदावरील व्यक्ती 'बेपत्ता' व्हावी यावरून पोलिस दलाचा कारभार किती भोंगळ आहे हे दिसते. सातारा जिल्ह्यातील फलटण येथील रुग्णालयातील या वैद्यकीय अधिकारी महिलेने काही महिने आधी केलेल्या तक्रारीकडे पोलिसदलातील वरिष्ठ अधिकार्यांनी दुर्लक्ष केल्याचे उघड झाले आहे. गोपाळ बदने याला वाचवण्यासाठी ते अधिकारी प्रयत्न करत होते का ही शंका यामुळे येते. महिला डॉक्टरचा मृतदेह सापडल्यावर पोलिसांनी आधी 'अकस्मात मृत्यु' अशी नोंद केली होती. मात्र तळ-हातावर तिने लिहिलेल्या आत्महत्येच्या कारणात दोघांचा उल्लेख आहे, त्याची दखल घेणे पोलिसांना भाग पडले आणि बदने व प्रशांत बनकर नामक व्यक्तीविरुद्ध त्यांना गुन्हा दाखल करावा लागला.

**वर्दीची गुर्मी**


मुळात एका उच्चशिक्षित महिलेस आत्महत्या करावीशी वाटली या वरूनच तिच्यावरील ताण किती असह्य होता याची कल्पना येते. जीवन संपवण्याचे कारण कागदावर सविस्तर लिहिण्याचे मानसिक त्राणही तिच्यामध्ये उरले नव्हते म्हणून तिने आपल्या तळ हातावर कारण लिहिले. त्यात बदने याचे नाव आहे. तो गेले काही महिने तिला शारीरिक व मानसिक त्रास देत होता असे त्या महिलेने पोलिसांकडे पूर्वी दाखल केलेल्या तक्रारीवरून स्पष्ट होते. अटक केलेल्या काही व्यक्ती वैद्यकीय अथवा शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे प्रमाणपत्र या महिलेने दिले नव्हते, त्यामुळे बदने व अन्य दोन जण तिच्यावर दबाव आणत होते असे तिने तक्रारीत म्हटले आहे. आपल्या कोणत्याही कर्मचार्याविरुद्ध कोणी तक्रार केल्यास त्याची दखल घेण्याची, संबंधित व्यक्तीची चौकशी करण्याची जबाबदारी वरिष्ठ पोलिस अधिकार्यांची आहे.उप विभागीय उप अधीक्षक, या पदावरील व्यक्तीस तिच्या तक्रारीचे गांभीर्य समजले नाही की तक्रारीची दखल घेण्याची त्यांची इच्छा नव्हती? त्याचे कारण काय? हे बघता या महिलेच्या आत्महत्येच्या प्रकरणाच्या चौकशी बरोबरच सातारा जिल्ह्यातील वरिष्ठ पोलिस अधिकार्यांचीही चौकशी होणे गरजेचे ठरत आहे.

केवळ साताराच नव्हे, तर राज्याच्या पोलिस दलाची चौकशी आणि तपासणी होणे आवश्यक आहे. गुंडांचे साम्राज्य उभे राहाते आणि पोलिस बघ्याची भूमिका घेतात हे अनेक ठिकाणी दिसले आहे. बीड जिल्हा हे एक उदाहरण. गुन्हेगार आणि पोलिसांची 'मैत्री' झाल्याशिवाय असे होणे अशक्य असते. गुन्हेगार पोलिसांना दरमहा रक्कम देतात हे उघड गुपित आहे. पूर्वी सरकारी कर्मचार्यांना आणि पोलिसांना 'चिरी मिरी' दिली जात असे. खुल्या आणि आलिशान अर्थव्यवस्थेतील पोलिसांचे त्यावर कसे समाधान होईल? त्यांनी आता लाचेचे 'दरपत्रक'च ठरवले आहे. आम्ही अभय दिल्यामुळे तुमचे काळे धंदे चालू राहतात त्या बदल्यात हे शुल्क देणे भाग आहे हा विचार त्या मागे आहे. एकटा दुकटा अधिकारी त्यात नसतो, तर पूर्ण साखळीच त्यात असते. त्यामुळेच एखाद्या अधिकार्याविरुद्ध कोणी तक्रार केलीच तर त्याची दखल कोणी घेणार नाही, आपल्याला काही होणार नाही असा 'विश्वास' पोलिसांत पसरला आहे. किंबहुना आमच्या विरुद्ध जाण्याची कोणाची हिंमत आहे? ही मस्तवाल वृत्ती निर्माण झाली अहे. खाकी वर्दीची ही गुर्मी आहे. सत्ताध-ारी देखील अशा अधिकार्यांकडे सोयीनुसार दुर्लक्ष करतात. सरकारी रुग्णलयातील वैद्यकीय अधिकारी महिलेवर अनेकदा बलात्कार करण्याचे

## डॉक्टर टीप्स

### टेस्टोस्टेरोनची निर्मितीसाठी....

असं सांगितलं जातं, जेव्हा अफ्रोडाईट या प्रेमाच्या ग्रीक देवतेचा जन्म झाला, ती समुद्रातून वर आली होती. या देवतेच्या नावावरुनच ॲफ्रोडिजियाक हे नाव पडलं आहे. कामेच्छा जागृत करणाऱ्या अन्नाला अफ्रोडिजियाक म्हटलं जातं. कालवांना ॲफ्रोडिजियाक म्हटलं जातं. कालवांमध्ये मोठ्या प्रमाणात झिंक आढळतं. शरीरात टेस्टोस्टेरोनची निर्मिती करण्यासाठी झिंकचा उपयोग होतो. संशोधनानुसार, झिंकमुळे वीर्याची गुणवत्ता वाढून प्रजननक्षमतेतही वाढ होते.



शेलफिश, रेड मिट, भोपळा, अंबाडी, तीळ, काजू, बदाम, चवळीच्या शेंगा, वाटाणे, मटकी, दूध आणि चीज या पदार्थांमध्येही झिंक मुबलक प्रमाणात आढळतं. चॉकलेट तुम्हाला उत्तम प्रेमी बनवेल का? जास्त चॉकलेट खात असल्यास प्रेमात पडण्याची शक्यता जास्त असते, असं म्हणतात. चॉकलेटमध्ये फिनाईलईथिलॅमाईन (पीईए) असतं. त्याला लव केमिकल असंही म्हटलं जातं.

**(क्रमशः)**

## विनोद




डॉक्टर : तू आता काही तासांचाच सोबती आ- हेच. तुझी शेवटची इच्छा सांग.

पेशंट : हो, मला दुसऱ्या डॉक्टरला दाखवायचे आहे.

## संदेश

Dhamki
Kappil Office ja raha tha..
Patni Piyar se Boli:
"See U in the Evening."
.Kappil Ghusse se: Saali
Dhamki kise de rahi hai?
Me Bhi Tujhe Dekh lunga..

## सुविचार



खोट्याचे मर्म फसवणुकीत आहे, शब्दांत नाही.


- महात्मा गांधी

**संस्कृत सुभाषित**

**अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मन :॥**
**(भीष्मपर्व, अध्याय २८, श्लोक ४० महाभारत)**

अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

### आडवे उत्तरे


१.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

### उभे उत्तरे

१.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### रोहित शर्मा ऑस्ट्रेलियातून परतला, चाहत्याचा २०२७ च्या वर्ल्डकपचा प्रश्न, हिटमॅनने काय उत्तर दिले?

मुंबई–ऑस्ट्रेलियातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका



संपल्यानंतर रोहित शर्मा भारतात दाखल झाला आहे. रोहित शर्मानं अखेरच्या दोन एकदिवसीय सामन्यात धमाकेदार फलंदाजी केली. भारतानं जरी मालिका गमावली असली तरी रोहित शर्माला 'प्लेअर ऑफ द सीरीज' पुरस्कार देण्यात आला. रोहित शर्मा मुंबई विमानतळावर दाखल झाल्यानंतर चाहत्यांनी जोरदार स्वागत केलं. रोहित शर्मानं चाहत्यांसोबत सेल्फी काढली.रोहित शर्माच्या चाहत्यानं त्याला एक प्रश्न विचारला. तो प्रश्न रोहित शर्माच्या प्रत्येक चाहत्याच्या मनातील होता. रोहित शर्मा २०२७ चा वर्ल्ड कप खेळणार की नाही असा प्रश्न चाहत्यानं विचारला होता.रोहित शर्माने कसोटी आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. सध्या रोहित शर्मा वनडे क्रिकेटमध्ये भारताचा सलामीवीर आहे.

रोहित शर्मा पुन्हा मैदानावर कधी दिसणार?

रोहित शर्मा आंतरराष्ट्रीय क्रिकेटध्ये सध्या केवळ एकदिवसीय सामने खेळत असल्यानं चाहत्यांना पुढील वनडे मालिकेची वाट पाहावी लागणार आहे. मात्र, चाहत्यांठी आनंदाची बाब म्हणजे एका महिन्यात रोहित शर्मा पुन्हा मैदानावर दिसेल.

***

### सलामीवीर फलंदाज स्पर्धेबाहेर; 'या' स्फोटक खेळाडूला मिळाली संधी

दिल्ली–भारतीय महिला संघाने वनडे विश्वचषक २०२५ च्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सेमीफायनल सामना ३० ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. पण या सामन्यापूर्वी भारतीय संघाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. भारताची फॉर्मात असलेली सलामीवीर आणि शतकी खेळी केलेली फलंदाज स्पर्धेबाहेर झाली आहे. तिच्या जागी बदली खेळाडूचीही घोषणा करण्यात आली आहे.भारतीय महिला संघाची सलामीवीर प्रतिका रावल विश्वचषकातील उर्वरित सामन्यांमधून बाहेर पडली आहे. बांगलादेशविरुद्ध गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना उजव्या पायाला दुखापत झाली. यानंतर ती फिजिओचा आधार घेत मैदानाबाहेर गेली.क्षेत्ररक्षण करताना प्रतिकाचा उजवा पाय मुरगळला, त्यानंतर ती बांगलादेशविरुद्ध सामन्यात फलंदाजीसाठी आली नाही आणि आता ती ३० ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात खेळू शकणार नाही, याबाबत अधिकृत अपडेट समोर आली आहे. प्रतिका रावल स्पर्धेबाहेर होणं ही टीम इंडियासाठी खूप वाईट बातमी आहे कारण ही खेळाडू उत्कृष्ट फॉर्ममध्ये होती.

***

### शमी–आगरकर वाद टोकाला पोहोचला, भारतीय क्रिकेटमध्ये वेगवान घडामोडी!



कोलकाता–मोहम्मद शमीसोबत सुरू असलेल्या वादानंतर परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न बीसीसीआयकडून सुरू झाला आहे. मागच्या काही आठवड्यांपासून मोहम्मद शमी आणि निवड समिती प्रमुख अजित आगरकर यांच्यात ठिणगी पडली आहे. शमी जाहीरपणे अजित आगरकरच्या दाव्यांचं खंडन करत आहे. शमी निवडीसाठी फिट नसल्यामुळे तो चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ नंतर टीम इंडियाकडून खेळला नसल्याचं अजित आगरकर म्हणाले.

अजित आगरकर यांच्या या दाव्यावर मोहम्मद शमीने पलटवार केला. 'निवड समितीने मला कोणतीही अपडेट दिली नाही. मी फिट नसतो तर दुलीप ट्रॉफी आणि बंगालकडून रणजी ट्रॉफी कशी खेळले असतो?' असं शमी म्हणाला. यावर मी खेळाडूंसोबत संपर्कात असतो आणि माझा मोबाईलही नेहमी सुरू असतो, असे प्रत्युत्तर अजित आगरकरने दिले होते.मोहम्मद शमी आणि निवड समिती प्रमुख यांच्यातला वाद आणखी वाढू नये, यासाठी बीसी–सीआय ॲक्शन मोडवर आली आहे. बीसीसीआयने सेंट्रल झोनचे नवनियुक्त निवड समिती सदस्य आरपी सिंग याला कोलकात्यामध्ये पाठवले आहे. इडन गार्डनमध्ये बंगाल आणि गुजरात यांच्यात रणजी ट्रॉफीचा सामना सुरू आहे, या सामन्यादरम्यान आरपी सिंग मोहम्मद शमीसोबत बराच वेळ गप्पा मारताना दिसला. शमीप्रमाणेच आरपी सिंगही उत्तर प्रदेशचा आहे, त्यामुळे दोघांमध्ये चांगला संवाद होऊ शकतो, त्यामुळे शमीची भेट घेण्यासाठी आरपी सिंग आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रणजी मोसमाच्या पहिल्याच सामन्यात मोहम्मद शमीने ७ विकेट घेतल्या, यानंतर त्याने निवड समितीवर निशाणा साधला. अपडेट देणे किंवा मागणे ही माझी जबाबदारी नाही. माझ्या फिटनेसबद्दल अपडेट देणे हे माझे काम नाही. माझे काम एनसीएमध्ये जाणे, तयारी करणे आणि सामने खेळणे आहे, असे मोहम्मद शमी म्हणाला होता, यानंतर अजित आगरकरनेही प्रतिक्रिया दिली.

## भारत–ऑस्ट्रेलिया महिला वर्ल्डकप उपांत्य सामना पावसामुळे रद्द झाल्यास?

मुंबई : महिला वनडे वर्ल्डकप २०२५ आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, क्रिकेट चाहत्यांना उपांत्य फेरीतील रोमांचक सामन्यांची प्रतीक्षा आहे. दुसरा उपांत्य सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया या बलाढ्य संघांमध्ये ३० ऑक्टोबर रोजी खेळवला जाणार आहे. मात्र, जर हा सामना पावसामुळे पूर्ण होऊ शकला नाही तर काय होईल, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

आयसीसीने विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीतील दोन्ही सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवला आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील उपांत्य सामन्यासाठी ३१ ऑक्टोबर हा राखीव दिवस असेल.

सामना रद्द झाल्यास काय होईल?

जर ३० ऑक्टोबर रोजी पावसामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सामन्यात किमान २० षटकांचा खेळ शक्य झाला नाही, तर तो सामना दुसऱ्या दिवशी म्हणजेच राखीव दिवशी (३१ ऑक्टोबर) हलवला जाईल. राखीव दिवशी सामना जिथे थांबला होता, तिथूनच पुन्हा सुरू होईल. एकदा नाणेफेक झाली की, सामना 'लाईव्ह' मानला जातो.



जर राखीव दिवशीही पाऊस पडला आणि सामना पूर्ण होऊ शकला नाही, तर आयसीसीच्या नियमानुसार, साखळी फेरीत गुणतालिकेत उच्च स्थानी असलेल्या संघाला अंतिम फेरीत प्रवेश मिळेल.

साखळी फेरीतील कामगिरीनुसार, ऑस्ट्रेलियन संघ गुणतालिकेत अव्वल स्थ–ानावर होता, तर भारतीय संघ चौथ्या स्थ–ानावर होता. त्यामुळे, जर दोन्ही दिवसांचा खेळ पावसामुळे पूर्णपणे रद्द झाला, तर ऑस्ट्रेलियाचा संघ थेट अंतिम फेरीत प्रवेश करेल आणि भारतीय संघाचे आव्हान संपुष्टात येईल.

थोडक्यात, भारतीय संघाला अंतिम फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत हा उपांत्य सामना जिंकावा

## भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रोहिणी कलमची आत्महत्या!

मध्यप्रदेश: आशियाई खेळात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रोहिणी कलमने गळफास घेत आत्महत्या केली आहे. रोहिणी अवघ्या ३५ वर्षाची असून जुजुत्सू खे–ळात तिने भार–ताचे प्रतिनिधित्व केले आहे. रोहिणीची लहान बहीण रोशनीच्या घरात लटकलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह आढळला. यानंतर तिला तात्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत तिने प्राण सोडला होता. रोहिणीच्या या चुकीच्या निर्णयामुळे क्रीडा विश्वात आता खळबळ उडाली आहे.रोहिणीची लहान बहीण रोशनीने सांगितलं की, रोहिणी सध्या एका खासगी शाळेत मार्शल आर्ट कोच या पद–ावर कार्यरत होती. तिचे शाळेत काही वाद सुरु होते. ती शनिवारी घरी आली, त्यावेळी नाराज असल्याची दिसली. तसेच रोहिणीने आत्महत्या करण्यापूर्वी तिचे फोनवर कोणासोबत तरी बोलणे झाले होते. यानंतर ती खोलीत गेली आणि दरवाजा बंद करून घेतला. हा फोन कोणाचा याबद्दल अजून माहिती मिळाली नाही. दरम्यान तिची आई आणि बहीण सकाळी देवदर्शनाला गेले होते. तर वडील कामानिमित्त घराबाहेर गेले होते. त्यामुळे घरात कोणीही नसताना रोहिणीने टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. राज–धानी दिल्लीमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. २० वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर तिच्याच परिचित असलेल्या तरुणाने दोन रोहिणीने आत्महत्या का करत आहे? याबद्दल कोणाशीच काहीच संवाद साधला नाही. अथवा कोणती चिठ्ठीदेखील लिहीली नाही. त्यामुळे आता केवळ त्या एका फोन नंबरवरून पोलिसांना तपास करावा लागणार आहे.





## सूर्यकुमारच्या खराब फॉर्मवर प्रशिक्षक गौतम गंभीरचा पूर्ण पाठिंबा!

मुंबई: भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील आगामी टी–२० मालिकेपूर्वी टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादव याच्या खराब फॉर्मबद्दल मोठे वक्तव्य केले आहे. फलंदाजीतील सातत्य गमावलेल्या 'सूर्या'ला गंभीर यांनी पूर्ण पाठिंबा दिला असून, त्यांच्या मते वैयक्तिक अपयशामुळे संघाच्या 'अल्ट्रा–ॲग्रेसिव्ह' (अति–आक्रमक) धोरणावर कोणताही परिणाम होणार नाही.

गंभीर म्हणाले, प्रामाणिकपणे सांगायचे तर, सूर्याचा फॉर्म माझ्यासाठी चिंतेचा विषय नाही. कारण आम्ही ड्रेसिंग रूममध्ये अति–आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला आहे. जेव्हा तुम्ही हे तत्त्वज्ञान स्वीकारता, तेव्हा अपयश अटळ असते. सूर्यासाठी ३० चेंडूंमध्ये ४० धावा करणे आणि टीका टाळणे सोपे आहे, पण आम्ही सामूहिकरित्या निर्णय घेतला आहे की, या आक्रमक दृष्टिकोनाचा पाठपुरावा करताना अपयशी ठरले तरी चालेल, असे गंभीर यांनी स्पष्ट केले. म्हणजेच, ते वैयक्तिक धावसंख्येपेक्षा खेळाच्या 'ब्रँड'ला अधिक महत्त्व देत आहेत. गंभीर यांनी सांगितले की, टी–२० क्रिकेटमध्ये केवळ धावा महत्त्वाच्या नसतात, तर 'इम्पॅक्ट' (खारिर्ली) महत्त्वाचा असतो. जेव्हा सूर्या पुन्हा फॉर्ममध्ये येईल, तेव्हा तो ही जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडेल. गंभीर यांनी सूर्यकुमारच्या नेतृत्वगुणांचे कौतुक केले. सूर्य एक उत्कृष्ट माणूस आहे आणि चांगले लोक चांगले नेते बनतात. त्याचे मुक्त व्यक्तिमत्व टी–२० क्रिकेटच्या साराशी जुळते. टी–२० म्हणजे स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती (ऋीशशवो रपव ए्रिशीीळेप), असे ते म्हणाले. गंभीर यांनी खुलासा केला की, त्यांच्या पहिल्याच संभाषणात दोघांनीही हरण्याची भीती कधीही ड्रेसिंग रूममध्ये येऊ द्यायची नाही, यावर सहमती दर्शवली होती. गंभीर म्हणाले, माझे ध्येय सर्वात यशस्वी प्रशिक्षक बनणे नाही, तर आमचा संघ सर्वात निर्भीड (ऋशरीश्रशीी) संघ असावा.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने नुकताच आशिया कप जिंकला, परंतु या स्पर्धेत सूर्याला बॅटने फारशी चांगली कामगिरी करता आली नाही (सात डावांत फक्त ७२ धावा). त्यामुळे त्याच्या फॉर्मवर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. या टीकेच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षक गंभीर यांनी आपल्या कर्णधाराला पूर्ण पाठिंबा देत, संघाच्या 'आक्रमक' धोरणामुळे तात्पुरते अपयश आले तरी चालेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## भारताला मोठा धक्का! प्रतीका रावल दुखापतीमुळे उपांत्य फेरीतून बाहेर

मुंबई : भारतीय महिला क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. सलामीवीर प्रतीका रावल हिला झालेल्या दुखापतीमुळे ती ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या महिला एकदिवसीय विश्वचषक उपांत्य फेरीतून बाहेर झाली आहे. स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक धावा करणारी ही फलंदाज आता अंतिम फेरीसाठीही अनिश्चित आहे.

बांगलादेशविरुद्धच्या शेवटच्या लीग सामन्यात क्षेत्ररक्षण करताना रावलच्या डाव्या घोट्याला दुखापत झाली. २१ व्या षटकात शर्मिन अख्तरने दीप्ती शर्माच्या गोलंदाजीवर डीप मिडविकेटकडे फटका मारला. चेंडू अडवण्यासाठी रावल धावत असताना तिचा पाय अडकल्यासारखा झाला आणि ती जमिनीवर कोसळली. त्या क्षणी तिचा घोटा मुरगळला आणि ती वेदनेने तडफडू लागली. यानंतर ती रावल फिजिओच्या मदतीने मैदानाबाहेर गेली. नंतर ती फलंदाजीला उतरली नाही. त्या डावात स्मृती मानधना आणि अमनजोत कौर यांनी सलामी दिली. पावसामुळे सामना थांबण्यापूर्वी अमनजोतने नाबाद १५ धावा केल्या होत्या.



२५ वर्षीय रावलने या विश्वचषकात सहा डावांमध्ये ३०८ धावा केल्या आहेत, ५१.३३ च्या सरासरीने आणि ७७.७७ च्या स्ट्राइक रेटने. तिने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ७५ आणि न्यूझीलंडविरुद्ध शानदार १२२ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडविरुद्धच्या शतकानंतर ती महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १००० धावा पूर्ण करणाऱ्या संयुक्त फलंदाजांपैकी एक ठरली. या स्पर्धेत तिच्या जोडीदार स्मृती मानधनानेच रावलपेक्षा जास्त धावा केल्या आहेत.रावल आणि मानधनाने मिळून या विश्वचषकातील टॉप पाच भागीदारींपैकी न्यूझीलंडविरुद्ध २१२ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध १५५ धावांची भागीदारी केली आहे.उपांत्य फेरीत मानधनासोबत अमनजोत कौर, हरलीन देओल किंवा उमा छेत्री यांपैकी कोणतीही खेळाडू सलामी देऊ शकते. उमा छेत्रीने यापूर्वी सराव सामन्यात तसेच टी–२० क्रिकेटमध्ये सलामी दिली आहे. जेमिमा रॉड्रिग्जलाही सलामीचा अनुभव आहे.रावलच्या पुनरागमनाबाबत किंवा अंतिम फेरीत खेळण्याबाबत सध्या अधिकृत घो–षणा झालेली नाही. भारताच्या राखीव यादीत तेजल हसबनीस ही एकमेव अतिरिक्त फलंदाज आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील उपांत्य सामना ३० ऑक्टोबर रोजी नवी मुंबईत खेळवला जाणार आहे.

## हॅरी ब्रूकच्या शतकानंतरही इंग्लंडचा न्यूझीलंडकडून पराभव

माउंट माउंगानुई : न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात माउंट माउंगानुई येथे पहिला एकदिवसीय सामना खेळला गेला. या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी केली, पण सुरुवात अतिशय खराब झाली. केवळ ३३ धावांवर इंग्लंडचा अर्धा संघ तंबुत गेला. मात्र, त्यानंतर हॅरी ब्रूकने मैदानात अक्षरशः धुमाकूळ घातला आणि इंग्लंडचा डाव सावरला. एकवेळ ३३/५ वर असलेला संघ त्याने २२३ धावांपर्यंत नेला. ब्रूक ३५.२ षटकात बाद झाला, पण त्याआधी त्याने १०१ चेंडूंमध्ये १३५ धावा ठोकल्या, ज्यात ९ चौकार आणि तब्बल ११ षटकारांचा समावेश होता.

या झंझावाती खेळी दरम्यान ब्रूकने अनेक मोठे विक्रम आपल्या नावावर केले. तो इऑन मॉर्गननंतर एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार ठोकणारा इंग्लंडचा दुसरा कर्णधार ठरला आहे. तसेच एका वनडे डावात सर्वाधिक षटकार ठोकणार्या इंग्लंडच्या चौथ्या फलंदाजाच्याही यादीत त्याचा समावेश झाला आहे. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी केली. पण सुरुवातीला मोठा धक्का बसला, केवळ १० धावांवर ४ गडी बाद झाले. त्यानंतर स्कोर झाला ५६/६. एका टोकावर विकेट्स पडत असताना, दुसर्या टोकावर ब्रूक ठामपणे उभा राहिला आणि १०१ चेंडूंवर १३५ धावा ठोकल्या. त्याने एकूण २० चौकार–षटकारांची फटकेबाजी केली. जेमी ओव्हर्टननेही (४६) चांगली साथ दिली आणि दोघांनी मिळून सातव्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. त्यांच्याशिवाय इतर कोणताही इंग्रजी फलंदाज द्विशतकी आकडा पार करू शकला नाही.ब्रूकने शेवटच्या विकेटसाठी ५७ धावा केल्या आणि ८२ चेंडूंवर सलग तीन षटकार ठोकत आपले शतक पूर्ण केले. त्यानंतरही त्याने चार षटकार झळकावले, पण मिशेल सॅन्टनरच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो बाद झाला. इंग्लंडचा डाव २२३ धावांवर संपुष्टात आला. ही ब्रूकची एकदिवसीय क्रिकेटमधील दु–सरी शतकी खेळी ठरली. तसेच, एका डावात १० पेक्षा जास्त षटकार ठोकणारा तो इंग्लंडचा फक्त दुसरा कर्णधार ठरला.हॅरी ब्रूकच्या करिअरमधील हे दुसरे वनडे शतक ठरले. आत्तापर्यंत त्याने ३३ वनडे सामन्यांत ३८.९६ च्या सरासरीने ११३० धावा केल्या आहेत, ज्यात २ शतके आणि ६ अर्धशतके आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने ३० सामन्यांच्या ५० डावांत ५७.५५ च्या सरासरीने २८२० धावा केल्या असून १० शतके आणि १३ अर्धशतके झळकावली आहेत. टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ब्रूकने ५२ सामन्यांत

## श्रेयस अय्यर आयसीयू मध्ये दाखल; डॉक्टरांनी सांगितले अंतर्गत रक्तस्त्रावाचे कारण!

सिडनी : भारतीय वनडे क्रिकेट संघाचा (खपवळरप जऊख ढशरा) उपकर्णधार (तळलश–उरींरिळप) श्रेयस अय्यर (डहीशूरी खूशी) याच्या तब्येतीबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. त्याला सिडनी येथील रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रेयस अय्यरला अंतर्गत रक्तस्राव (खपींशीपरश्र इश्रशशव–ळपस) झाल्याचे निदान झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून त्याला रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेयसला पुढील पाच ते सात दिवस रुग्णालयातच राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे, क्रिकेट चाहत्यांचे आणि टीम इंडियाचे लक्ष आता श्रेयस अय्यरच्या तब्येतीच्या अपडेट्सकडे लागले आहे.

कशी झाली दुखापत?

श्रेयस अय्यर याला अंतर्गत रक्तस्रावामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही दुखापत त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात सिडनी येथे झाली होती. ऑस्ट्रेलियन फलंदाजीच्या ३४ व्या ओव्हरमध्ये श्रेयसला ही दुखापत झाली. हर्षित राणाच्या गोलंदाजीवर फलंदाज एलेक्स कॅरीचा झेल पकडत असताना ही घटना घडली. बॅकवर्ड पॉइंटला क्षेत्र–क्षण करत असलेल्या श्रेयस अय्यरने मागे धावत जाऊन हा झेल पकडला. मात्र, याच प्रयत्नात त्याच्या बरगड्यांना गंभीर मार लागला. या दुखापतीमुळेच त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले असून, त्याला अंतर्गत रक्तस्रावाचा त्रास होत आहे.

मैदानावरच वेदनेने विव्हळला श्रेयस अय्यर

सिडनी वनडेत झेल पकडताना झालेल्या दुखापतीमुळे उपकर्णधार श्रेयस अय्यरची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. मैदानावरच तो पोट आणि छातीचा भाग पकडून वेदनेने विव्हळताना स्पष्टपणे दिसला. यावरून त्याच्या दुखापतीची गंभीरता दिसून आली. त्याची अवस्था पाहून तात्काळ मेडिकल टीमला मैदानावर बोलवण्यात आले आणि टीमने त्याला मैदानाबाहेर नेले. या गंभीर इंजरीची गंभीरता लक्षात घेऊनच त्याला तातडीने सिडनी येथील रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.



**उपचारासाठी श्रेयस अय्यरला आठवडाभर रुग्णालयात ठेवणार**

टीम इंडियाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी टी२० मालिकेचा भाग नसला तरी, त्याला तातडीच्या उपचारासाठी सिडनीमध्येच थांबवण्यात आले आहे. त्याला झालेली अंतर्गत रक्तस्रावाची दुखापत गंभीर असल्याने, टीम मॅनेजमेंटने त्याला उपचारासाठी सिडनीतील रुग्णालयात ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या त्याला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. वैद्यकीय अहवालानुसार, श्रेयस अय्यरला सुमारे आठवडाभर रुग्णालयातच राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे तो पूर्णपणे बरा होईपर्यंत मॅनेजमेंट त्याच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

श्रेयस अय्यरचे मैदानावर पुनरागमन कधी?

श्रेयस अय्यर रुग्णालयात उपचाराधीन असल्याने, तो पुन्हा मैदानावर कधी परतणार, असा प्रश्न क्रिकेटप्रेमींकडून विचारला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रेयस अय्यर ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या पहिल्या वनडे सामन्यात खेळण्याची शक्यता आहे. मात्र, ही केवळ शक्यता असून, श्रेयस अय्यरच्या उपलब्धतेबद्दल कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आ–लेली नाही. त्याच्या दुखापतीची गंभीरता पाहता, बीसीसीआय (बीसीसीआय) आणि वैद्यकीय पथक त्याच्या प्रकृतीचा आढावा घेऊन लवकरच याबद्दल निर्णय घेण्याची शक्यता आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात सचोटी प्रतिज्ञा घेऊन दक्षता जागरुकता सप्ताह २०२५ ला सुरुवात

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) कार्यालय, सोलापूर येथे आयोजित सचोटी प्रतिज्ञा घेऊन दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ ला सुरुवात केली. या प्रसंगी, विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि सार्वजनिक सेवेत पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सचोटी प्रति त्यांची वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली.






सचोटी जागरूकता सप्ताह हा केंद्रीय दक्षता आयोगाच्या (सीव्हीसी) प्रमुख सहभागी दक्षता उपक्रमांपैकी एक आहे ज्याचा उद्देश सक्रिय नागरिकांच्या सहभागाद्वारे सचोटी वाढवणे आणि भ्रष्टाचार निर्मूलन करणे आहे. हे सर्व भागधारकांना – सरकारी अधिकारी, खाजगी संस्था आणि नागरिकांना – प्रशासनात नैतिकता आणि पारदर्शकतेचे महत्त्व याबद्दल जागरूक करण्यासाठी जागरूकता निर्माण आणि पोहोच मोहीम म्हणून काम करते.

दरवर्षी, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दक्षता जागरूकता सप्ताह साजरा केला जातो, जो त्यांच्या सचोटी आणि सुशासनाच्या आदर्शांना पुन्हा पुष्टी देतो. या वर्षी, दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ हा २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत साजरा केला जात आहे: ''दक्षता: आमची सामायिक जबाबदारी''

सचोटी प्रतिज्ञा मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (सीपीएम) यांनी दिली, ज्यांनी नागरिकांसाठी सचोटी प्रतिज्ञा आणि संघटनांसाठी सचोटी प्रतिज्ञा या दोन शपथा घेतल्या. या प्रतिज्ञांद्वारे, रेल्वे कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे नैतिक आचरण राखण्याचा, त्यांच्या कर्तव्यांमध्ये पारदर्शकता राखण्याचा आणि भ्रष्टाचार मुक्त संघटना उभारणीत योगदान देण्याचा संकल्प केला.

सोलापूर विभागातील विविध कार्यालये आणि स्थानकांमधील उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संबंधित कामाच्या ठिकाणी सचोटीची प्रतिज्ञा घेतली, ज्यामुळे रेल्वेच्या कामकाजाच्या प्रत्येक क्षेत्रात सचोटी आणि जबाबदारीची संस्कृती निर्माण करण्याची वचनबद्धता बळकट झाली.

या उपक्रमाद्वारे, सोलापूर विभाग दैनंदिन कामाच्या पद्धतींमध्ये प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करत असताना, पारदर्शक आणि जबाबदार कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देत आहे, प्रत्येक कर्मचाऱ्याला भारतीय रेल्वेचे मुख्य मूल्य म्हणून सचोटीचा अभिमान बाळगण्यास प्रोत्साहित करत आहे.

## सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरु करा आ. कराड यांची पणन मंत्र्याकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी** :नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या हमी भावाप्रमाणे लातूर जिल्हयात सोयाबीन खरेदी केंद्र लवकरात लवकर सुरू करावीत अशी मागणी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल साहेब यांच्याकडे लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी एका पत्राद्वारे केली आहे.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी व महापुराच्या संकटामुळे राज्यासह लातूर जिल्हयातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे. सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र अद्याप चालू झाले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. शासनाने जाहीर केलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीन खरेदी होणे गरजेचे आहे असे आ. कराड यांनी पत्रात नमूद केले आहे.

शासनाने जाहीर केलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात यावेत अशी शेतकऱ्यांतून मागणी होत आहे. तेव्हा नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी लवकरात लवकर लातूर जिल्हयात सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करावेत अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल साहेब यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

## 'पीएम जनमन' योजनेतील कामगिरीसाठी विद्युत मंत्रालयाकडून महावितरणचे कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान म्हणजेच पीएम जनमन योजनेमध्ये महावितरणने केलेल्या कामगिरीचे व १३१ टक्के उद्दिष्टपूर्तीचे केंद्रीय विदयुत मंत्रालयाने कौतुक केले आहे. याबाबत केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना पाठवलेल्या पत्रामध्ये महावितरणच्या कामगिरीचा गौरव केला आहे.

देशातील दुर्गम भागात निवासी व सर्वार्थाने दुर्बळ आदिवासी गट यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाने पीएम जनमन योजना सुरू केली आहे. दुर्गम भागातील अतिमागास जनजाती समूहांना सुरक्षित घरे, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, उपजीविकेच्या संधी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या योजनेअंतर्गत राज्यातील १६ जिल्ह्यांतील ११३७ गावांमध्ये लाभार्थ्यांना नवीन वीजजोडण्या व त्यासाठी विद्युतीकरणाची कामे महावितरणकडून वेगाने सुरू करण्यात आली. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही या कामांचा वेळोवेळी आढावा घेतला. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे योजनेमध्ये १३१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. महाराष्ट्रासाठी ८ हजार ५५६ लाभार्थ्यांना वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात तब्बल ११ हजार २३५ घरांमध्ये नवीन वीजजोडणी कार्यान्वित करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथे आदि कर्मयोगी अभियान २०२५ची राष्ट्रीय परिषद नुकतीच झाली. पीएम जनमन योजनेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मा. राष्ट्रपती महोदया यांच्याहस्ते केंद्रीय विद्युत मंत्रालयाचा या परिषदेत गौरव करण्यात आला. या गौरवासाठी महाराष्ट्राचा ऊर्जा विभाग व महावितरणचे देखील मोठे योगदान आहे. दुर्गम भागात निवासी आदिवासी गटांच्या घरांचे विद्युतीकरण करण्यासाठी महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचे कौतुक आहे. आदिवासी कल्याण, सक्षमीकरण व सर्वसमावेशक विकासात महाराष्ट्राच्या ऊर्जा विभागाचे व महावितरणचे योगदान महत्त्वाचे आहे, असे केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे.

## मध्य रेल्वे ''सतर्कता जागरुकता सप्ताह - २०२५'' साजरा

**मुंबई/प्रतिनिधी** : मध्य रेल्वे ''सतर्कता जागरूकता सप्ताह - २०२५'' साजरा करत आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांनी अधिकारी व कर्मचारी यांना प्रामाणिकतेची शपथ दिली

श्री विजय कुमार, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी २७.१०.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील महाव्यवस्थापक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर अधिकारी व कर्मचारी यांना प्रामाणिकतेची शपथ दिली. या कार्यक्रमाने मध्य रेल्वेवरील ''सतर्कता जागरूकता सप्ताह - २०२५'' चा शुभारंभ झाला. संस्थेच्या कार्यात प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता राखण्याची तसेच देशाचे नागरिक म्हणून प्रामाणिकता आणि पारदर्शकता जपण्याची शपथ महाव्यवस्थापक यांनी अधिकारी आणि कर्मचारी यांना दिली. मध्य रेल्वे २७ ऑक्टोबर २०२५ ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सतर्कता जागरूकता सप्ताहाचे आयोजन करत आहे. श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक; श्री नीरज कुमार दोहरे, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक व मुख्य सतर्कता अधिकारी; मध्य रेल्वेचे विभागप्रमुख; वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचारी प्रामाणिकतेची शपथ घेण्यासाठी उपस्थित होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली की ते सदैव उच्चतम प्रामाणिकतेचे मानदंड पाळतील आणि कोणत्याही प्रकारच्या भ्रष्ट आचरणाचा भाग होणार नाहीत.

मध्य रेल्वेच्या विविध विभागांमध्ये आणि कार्यशाळांमध्येही अधिकारी व कर्मचारी यांना प्रामाणिकतेची शपथ दिली गेली.

## जिल्हा परिषद ढोकी गटातून सौ. मनीषाताई केंद्रे सर्वात योग्य उमेदवार -जनतेचा विश्वास वाढला

**धाराशिव/रामेश्वर डोंगरे** :धाराशिव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा असलेला ढोकी जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणासाठी नुकतिच आरक्षण सोडत जाहीर झाली. जिल्हा परिषद गट एसटी या प्रवर्गासाठी सुटला आहे. इच्छुकाची आत्तापासूनच मोर्चा बांधणी करण्यात येत आहे. या गटातून भारतीय जनता पार्टीच्या विद्यमान जिल्हा चिटणीस व माजी प्रदेश कार्यकारणी सदस्य सौ. मनीषाताई नवनाथ केंद्रे यांना उमेदवारी देण्याची मागणी जोर धरत आहे.



केंद्रे ह्या उच्चशिक्षित असून त्या शिक्षिका आहेत. आमदार राणाजगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांच्या विश्वासू व एकनिष्ठ कार्यकर्त्या आहेत. त्यांचे मूळ गाव हे ढोकी जिल्हा परिषद गटातील कावळेवाडी आहे. सन २०१२ ते २०२२ पर्यंत सलग दहा वर्षे ग्रामपंचायत च्या सदस्य. दरम्यान २०१४ ते १५ एक वर्ष प्रभारी सरपंच व २०१४ ते १७ ग्रामपंचायतचे सलग तीन वर्ष उपसरपंच म्हणून त्यांनी कावळेवडी येथे त्यांनी कामकाज पाहिले आहे. त्यांना कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे.

पंधरा वर्षापासून सामाजिक कामात त्या सक्रिय भाग घेत आहेत. महिलांच्या प्रश्नावर त्या काम करत असताना त्यांच्या अडचणी व शासनाच्या सर्व योजना घराघरात पोचवणयचे ते काम करत आहेत. गेल्या पंधरा वर्षंपासून समाजकारणासह बीजेपीच्या माध्यमातून गरीब,अन्याय ग्रस्त, तसेच पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणे जनतेच्या सुखदुःखामध्ये सतत सोबत राहून समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी त्या नेहमी कटिबद्ध असतात. ढोकी जिल्हा परिषद गटात कार्यकर्ते व नागरिकाशी त्यांचा घनिष्ठ परिचय झाला आहे. सेवाकाळात त्यांनी सर्वांना मदतीचा हात दिला असून, समाजातील प्रत्येक घटकात आपुलकी आणि विश्वास निर्माण केला आहे.

शासकीय योजनेतून नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात. मी ही जिल्हा परिषद लढवावी अशी मागणी मतदार करत आहेत. पक्षाने नारीशक्ती सन्मान करून उमेदवारी दिल्यास मी निवडून येईल. पक्षाने जनतेची सेवा करण्याची संधी मला द्यावी अशी मागणी सौ. मनिषाताई केंद्रे यांनी केली आहे. ढोकी जिल्हा परिषद गटात भाजपच्या विचाराशी जोडलेले मतदार असून, विजय निश्चित आहे. त्यामुळे पक्षाने हा मतदार संघ भाजपकडे घेवून मला उमेदवारी दिल्यास मी ढोकी जिल्हा परिषद गटात पक्षश्रेष्ठीच्या नेतृत्वात विकासात्मक राजकारणावर भर देईल असे सौ. केंद्रे यांनी सांगितले.

## महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

### कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा



**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) दक्षता जनजागृती सप्ताह राज्यभर साजरा करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा दिली. प्रतिज्ञेनंतर मा. राज्यपाल आचार्य देवव्रत व मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा संदेश अनुक्रमे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण व संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर यांनी उपस्थितांना वाचून दाखवला. सप्ताहाच्या निमित्ताने राज्यभर जनजागृतीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे कार्यकारी संचालक (मा.सं.) श्रीमती सुचिता भिकाने यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता श्री. अमित नाईक, श्री. माणिक गुट्टे, श्री. संदीप हाके, श्री. प्रमोद चिमणकर, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. राजेंद्र पवार, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, अधीक्षक अभियंता श्री. भूषण साळुंखे, श्री. योगेश पाचपांडे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात येतो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी दक्षता : आपली सामायिक जबाबदारी ही संकल्पना घेऊन हा सप्ताह साजरा केला जाणार आहे.

# आ. कराड यांच्या उपस्थितीत फरदपुर येथील काँग्रेसच्या अनेकांचा भाजपात जाहीर प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर तालुक्यातील मौजे फरदपूर येथील काँग्रेसचे माजी सरपंच कुंडलिक मदने, सोसायटीचे व्हाईस चेअरमन दत्ता मदने यांच्यासह अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर ग्रामीण मतदार संघात आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन विविध गावचे अनेकजण भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करत आहेत. लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपाचे मंडल अध्यक्ष शरद दरेकर, महेंद्र गोडभरले, ओबीसी मोर्चाचे मंडल अध्यक्ष फरदपूरचे सरपंच बालासाहेब राठोड, भाजपाचे श्रीमंत नागरगोजे, प्रकाश जाधव, दीपक पवार, अजित पाटील, नरेश चपटे, फुलचंद पवार, भास्कर लहाने, संजय डोंगरे, प्रकाश राठोड यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत फरदपूर येथील माजी सरपंच कुंडलीक सुखदेव मदने, व्हाईस चेअरमन दत्ता बाजीराव मदने, ग्रामपंचायत सदस्य कस्तुरबाई मोहन फोलाने, संगीता राजाभाऊ मदने, गोविंद राठोड, सोसायटीचे संचालक गणपत पडुळकर यांच्यासह आप्पाराव देवकते, हरिभाऊ मदने, महादेव देवकते, श्रीहरी मदने, मुरलीधर मदने, उत्तम मदने, मोहन फोलाने, विष्णू पडळकर, राजाभाऊ अमनावार, ज्ञानदेव मदने, गोविंद राठोड, मीना देवकते, वर्षा मदने, लक्ष्मी मदने, महानंदा देवकते, शामल देवकते, सुमित्रा मदने, महानंदा मदने, उषा मदने, विजयमाला मदने, मोतीराम मदने यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.




पान २ वरून...

## ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. National Skill Development Corporation च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.



तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता (Media Literacy) वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे.

२८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते. आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. - ९९६०१०३५८२**

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# उमरग्यातील शेतकरी अन् सफाई कामगारांसोबत भाऊबीज साजरी: ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनकडून महिलांना साडी-चोळी भेट



उमरगा (प्रतिनिधी)-दिवाळीत गरीब, अतिवृष्टी बाधित, गरजू, गरिबांच्या घरी पणती प्रज्वलित व्हावी, त्यांनाही दिवाळीचा फराळ मिळावा. त्यांनाही सणाचा उत्साह मिळावा, यासाठी येथील ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या गुरुवारी (दि. २३) सफाई कामगार कर्मचारी महिलांना अनोखी भेट देत शहरातील सफाई कर्मचारी महिलांसोबत भाऊबीज साजरी केली. शहरातील फाऊंडेशनच्या कार्यालयात सर्वच ६० महिला सफाई कर्मचाऱ्यांना बोलावून, त्यांना साडी-चोळी भेट देऊन फाऊंडेशनच्या भावांनी या बहिणीकडून आशीर्वाद घेतले. या वेळी फाउंडेशनचे करीम शेख, प्रदीप चौधरी, किशोर बसगुंडे, कविता साळी आदी पदाधिकाऱ्यांसह महिला उपस्थित होत्या. होळीतील महिलांना साडी-चोळी भेट... होळी येथील शेतकरी महिलांसोबत ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनकडून भाऊबीज साजरी केली. होळी येथील शेतकरी महिलांना साडीचोळी भेट देऊन फाउंडेशनच्या भावांनी बहिणीकडून आशीर्वाद घेतले. या वेळी फाउंडेशनचे सत्यनारायण जाधव, ईश्वर नांगरे, करीम शेख, प्रदीप चौधरी, करण बाबळसुरे, किशोर बसगुंडे, विजय चितली यासह पदाधिकारी व शेतकरी महिला उपस्थित होत्या.

# सनासुदीत तुळजापुरात घाणीचे साम्राज्य: नागरिकांचे आरोग्य धोक्यात



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- तुळजापूर ऐन सनासुदीचा काळात शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. कचराकुंड्या ओसंडून वाहत आहेत. गटारी तुंबल्या आहेत. शहरातील स्वच्छतेकडे पालिकेचे दुर्लक्ष होत आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान स्वच्छतेसाठीचे महिन्याचे २४ लाख रुपये मुरतात कुठे? असा सवाल नागरिकांतून विचारण्यात येत आहे.

दीपावली उत्साहात साजरी करण्यात येत असताना ऐन सनासुदीत तुळजापुरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. कचराकुंड्या ओसंडून वाहत आहेत. गटारी तुंबल्याने दुर्गंधी पसरली आहे. भाविकांसह शहरवासीयांना अनेक ठिकाणाहून जाताना नाकाला रूमाल लावावा लागतोय.मात्र शहरातील स्वच्छतेकडे पालिकेचे दुर्लक्ष होत आहे. भाविकांसह शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विलगीकरण व प्रक्रियेला हरताळ १. घर टू घर जाऊन कचरा गोळा करणे, २. रस्ता स्वच्छता व कचरा वाहतूक, ३. गटार स्वच्छता व वाहतूक, ४. कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणे या चार टप्प्यात स्वच्छता अपेक्षित आहे. मात्र कचरा विलगीकरण व प्रक्रियेला हरताळ फासण्यात येत असल्याचे वास्तव आहे.

२४ लाख मुरतात कुठे? शहर स्वच्छतेचा ठेका समृद्धी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. पुणे या कंपनीला तीन वर्षांसाठी देण्यात आला आहे. स्वच्छतेसाठी पालिका समृद्धीला महिना २३ लाख ७६ हजार रुपये मोजत आहे. मात्र दररोज जवळपास एक लाख रुपये मोजून शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने स्वच्छतेसाठीचे २४ लाख मुरतात कुठे? असा सवाल विचारण्यात येत आहे. खत निर्मितीची मशीन धूळ खात पालिकेकडे १६ लाख रुपये किमतीची कचरा सेपरेशनची स्कॅनींग मशीन ऊईथ बेल्ड कन्वेअर ही मशीनरी वापरा अभावी धुळ खात पडून आहे.

# प्रभाग चारमधील विविध विकासकामांचे खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहरातील प्रभाग क्रमांक चारमधील विविध रस्ते व नाली विकासकामांचे लोकार्पण तसेच नव्या कामांचे भूमिपूजन खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांच्यासह स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत पार पडले. प्रभाग चारमध्ये या प्रभागात एकूण २ कोटी १८ लाख खर्चून रस्ते व नालीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. तसेच आणखी १ कोटी ९६ लाख रुपये निधीच्या माध्यमातून हाती घेण्यात येणार्या पायाभूत सुविधा विकासकामांचे भूमिपूजनही याप्रसंगी करण्यात आले.

या कामांमुळे नागरिकांना सुरक्षित, सुटसुटीत आणि नियोजित रहदारीची सुविधा उपलब्ध झाली असल्याचे शिवसेनेचे शहर संघटक प्रशांत (बापू) साळुंके यांनी सांगितले. त्याचबरोबर परिसरातील स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थेलाही मोठा आधार लाभणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्यात येत असून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे प्रयत्न यापुढेही सुरू राहतील, असेही ते म्हणाले.

यावेळी शिवसेनेचे शहर संघटक प्रशांत (बापू) साळुंके, जिल्हा सचिव प्रवीण भैय्या कोकाटे, उपजिल्हाप्रमुख विजय सस्ते, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवासेना शहरप्रमुख अभिजीत कदम, उपशहर प्रमुख बंडू आदरकर, नाना घाटगे, अमित उंबरे, मुकुंद उंबरे, सुधीर बंडगर, चंद्रकांत गायकवाड, बाबूराव मोरे, राहुल गवळी, महेंद्र शिंदे, रोहित गाबने, दत्ता सोकांडे, अनिकेत कोळगे यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बापू साळुंके यांच्या उमेदवारीबाबत चर्चा

विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यात प्रभाग चारमधील नागरिकांच्या समस्या सोडविण्साठी अहोरात्र प्रयत्न करणारे शिवसेनेचे शहर संघटक प्रशांत (बापू) साळुंके यांच्या उमेदवारीबाबत सुधीर बंडगर यांनी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांच्याकडे शब्द टाकला. त्यावर लवकरच याबाबत निर्णय घेवून घोषणा करण्यात येईल, असे खासदार व आमदारांनी स्पष्ट केल्याचे सुधीर बंडगर यांनी सांगितले.

# लोहारा तालुक्यातील स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मंचच्यावतीने सोहळ्याचे आयोजन

लोहारा (प्रतिनिधी)– लोहारा तालुक्यातील तावशीगड येथे स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मंच यांच्या वतीने शुक्रवारी (दि. २४) पंचक्रोशीतील नवनियुक्त शासकीय कर्मचारी, प्रगतशील शेतकरी, यशस्वी उद्योजक तसेच राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत होते. त्यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सामाजिक, शैक्षणिक व कौटुंबिक हित लक्षात घेऊन अनेक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून २०२२ ते २०२५ दरम्यान नियुक्त शासकीय कर्मचारी व यशस्वी उद्योजकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक पोटे, तालुका कृषी अधिकारी शिवकुमार पुजारी, कृषी अधिकारी प्रशांत जाधव, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक चोरमले, माधवराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तावशीगड हे अधिकाऱ्यांचे व यशस्वी उद्योजकांचे गाव म्हणून ओळख निर्माण करेल,अशी अपेक्षा यावेळी मान्यवरांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केली.या कार्यक्रम यशस्वीतेसाठी लक्ष्मण बिराजदार, गणेश बिराजदार, बालाजी दंडगुळे, व्यंकटसिंग राजपूत यांनी योगदान दिले. तावशीगड दिल्लीपर्यंत पोहोचावे अध्यक्षीय भाषणात चरणसिंग राजपूत म्हणाले, मी अधिकारी असलो तरी गावकऱ्यांच्या व सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यास नेहमी तत्पर आहे. तावशीगड येथील युवकांनी वर्ग १, २, ३ अधिकारी होऊन महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता दिल्लीपर्यंत पोहोचावे हीच माझी इच्छा असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. सत्कारमूर्तींना सन्मानचिन्ह व पुस्तके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आत्माराम पाटील, सूरज बिराजदार, नागेराव हुडेकर, आकाश पाटील, प्रसाद यादव, सत्यम आंबेकर, आकाश जाधव, महेश मिटकरी, रामदेव बिराजदार, प्रसाद बिराजदार, धीरज बिराजदार यांच्यासह ३० जणांचा सत्कार या वेळी करण्यात आला.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८९२
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव येथील महिलेचे उपोषण आ. कैलास पाटील यांच्या कार्यवाहीने अखेर थांबले..!

## आमदार असावा तर असा; तब्बल तासभर वेळ देत प्रशासन लावले कामाला प्रशासनाकडून लेखी आश्वासन




धाराशिव (प्रतिनिधी)- आठ दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण थांबवणे, काही लोकांसाठी फक्त फोटोशूट आणि सोशल मीडियावर रिल्स पुरतंच समाधान असू शकते. मात्र, प्रत्यक्ष काम करून दाखवण्याची जिद्द वेगळी असते. तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील संत गाडगेबाबा माध्यमिक (पोस्ट बेसिक) आश्रमशाळेतील प्रयोगशाळा परिचर सुवर्णा दिलीपसिंग राजपूत यांनी वेतनासाठी ऐन दिवाळीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन सुरू केले होते. मात्र प्रशासनाकडून दखल घेण्यात न आल्याचा आरोप होत होता. अखेर आ. कैलास घाडगे- पाटील यांनी या महिलेची उपोषण स्थळी जाऊन शुक्रवारी (दि.२४) भेट घेतली. तब्बल तासभर त्याच ठिकाणी स्वतः थांबून यंत्रणा कामाला लावली. थेट जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे यांना उपोषण स्थळी बोलावून घेतले आणि या महिलेला अवघ्या काही तासांत प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे माजी मंत्री प्रा लक्ष्मण ढोबळे यांची संत गाडगेबाबा माध्यमिक (पोस्ट बेसिक) आश्रम शाळा असून त्या शाळेत प्रयोगशाळा परिचर म्हणून कार्यरत असलेल्या सुवर्णा दिलीपसिंग राजपूत या महिला कर्मचाऱ्यास वेतन देण्यास टाळाटाळ केली जात आहे. राजपूत यांनी सोलापूर येथील पिठासीन अधिकारी शाळा न्यायधीकरण यांच्याकडे धाव घेतली होती. त्या न्यायालयाने दि.१६ एप्रिल २०२५ रोजी राजपूत यांच्यासारखा अंतिम आदेश दिले आहेत. तर धाराशिव जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकाऱ्यांनी जा.क्र. / जिपधा / सकवि / योजना - आश्रम शाळा / कावि ८१४ / २०२५ दि. १३/५/२०२५ रोजी वेतन देण्यात यावे असे पत्र दिलेले आहे. तसेच लातूर येथील समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त यांनी देखील पत्र क्र. २८/५१ दि. ७/१०/२०२५ रोजी पत्र देऊन वेतन देण्यात यावे असे नमूद केले आहे. मात्र, संस्थेच्यावतीने याबाबत अद्यापपर्यंत कुठल्याच प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे राजपूत यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. आमदार कैलास पाटील यांनी उपोषण स्थळी भेट देऊन सर्व हकीकत जाणून घेतले. त्यांनी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री काळे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांना उपोषण स्थळी बोलावून घेत राजपूत यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे श्री काळे यांनी राजपूत यांना लेखी पत्र दिले. या लेखी आश्वासनानंतर राजपूत यांनी उपोषण स्थगित केले आहे.

**तब्बल तासभर थांबून विषय मार्गी लावला**

आ. कैलास पाटील हे शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांच्या अनुदानासंदर्भात आले होते. प्रयोगशाळा परिचर म्हणून कार्यरत असलेल्या सुवर्णा दिलीपसिंग राजपूत या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वेतनासाठी उपोषण करत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर आमदार पाटील यांनी तातडीने उपोषण स्थळी भेट दिली. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी काळे यांना तातडीने बोलावून माहिती घेतली. तसेच तातडीने कार्यवाही करण्याचे निर्दे श दिले. प्रशासनाने अवघ्या काही तासात संबंधित महिलेला लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649